# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### जेएसडब्ल्यु स्टील कंपनीच्या धरमतर येथील जेट्टीच्या विस्तारिकरणासंदर्भात वडखळ येथे झालेली जनसुनावणी रद्द करण्याबाबत

**(१) ९५१० (०६-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोलवी (ता.पेण, जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यु स्टील कंपनीच्या धरमतर येथील जेट्टीच्या विस्तारिकरणासंदर्भात जनसुनावणीच्या आधीच्या रात्री कंपनीने शेतक-यांना नुकसान भरपाई व इतर काही बाबतीत लेखी आश्वासन दिले होते मात्र नुकसान भरपाई संदर्भात कोणतीही तरतूद कंपनीकडे नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जेट्टीसंदर्भात वडखळ येथे झालेली जनसुनावणी रद्द करण्यात यावी त्याचप्रमाणे खारमाचेला परिसरातील शेतीमध्ये कोणत्याही प्रकारे भराव टाकण्याची परवानगी कंपनीला देवू नये तसेच कंपनीने इतरत्र टाकलेल्या रसायनयुक्त भरावामुळे जमीनी नापिक झाल्यामुळे कंपनीची चौकशी करण्याची मागणी शेतक-यांनी तहसिलदार यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०३-२०१८) :** (१) अशी बाब जिल्हाधिकारी, रायगड यांच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी तलाठी, गडब, मंडळ अधिकारी, पेण, वनपाल, गडब, वनरक्षक, गडब यांनी पाहणी व चौकशी करून तहसील कार्यालय, पेण यांच्याकडे दि.१.४.२०१५ रोजी अहवाल सादर केला आहे. या चौकशी अहवालाप्रमाणे संबंधित जेएसडब्ल्यू कंपनी व्यवस्थापकाविरुद्ध

फआयआर क्र.१/२०१५ अन्वये वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार पोलीस ठाणे, वडखळ यांनी तपास करुन आर.सी. क्र.१०२ प्रमाणे दि.२९.६.२०१६ रोजी पेण येथील न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून सदर बाब न्यायप्रविष्ट आहे.

तसेच नैसर्गिक नाल्यातील लोखंडी पाईप कंपनीने काढून टाकल्याचे दिसून आले असून सदर नाल्यामधून पाणी जाण्यायेण्यासाठी कोणताही अडथळा नसल्याचे व नाल्याशेजारी थोडासा भराव दिसून येत असल्याचे तलाठी सजा, गडब यांनी दि.२७.११.२०१७ रोजी समक्ष पाहणी करून तहसिलदार, पेण यांच्याकडे सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी केलेले कामबंद आंदोलन**

**(२) ३२२८८ (२३-१२-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांची अपूर्ण संख्या तसेच तांत्रिक दर्जासह वेनतश्रेणी देण्यासाठी राज्यातील पूणे, ठाणे, नाशिक व इतर अनेक जिल्ह्यातील भुमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलन करुन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने अद्यापही कोणतीही अंमलबजावणी केली नसल्याचे उपरोक्त कर्मचारी संघटनेचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत राज्यात भूमी अभिलेख तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे व रिक्त पदे किती आहेत, सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०४-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राज्य भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी पुणे विभागात दि.१६.०१.२०१५ ते ०९.०२.२०१५ या कालावधीत तर मुंबई, नाशिक व औरंगाबाद विभागात दि.२७.०१.२०१५ ते ०७.०२.२०१५ या कालावधीत काम बंद आंदोलन केले होते.

जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या संवर्गांना तांत्रिक दर्जा देऊन त्याप्रमाणे वेतनश्रेणी देण्याच्या कर्मचाऱ्यांच्या मागणीसंदर्भात शासनास प्रस्ताव सादर केला आहे. मात्र भूमि अभिलेख विभागातील काही संवर्ग वगळता, अन्य संवर्गातील पदभरतीच्या नियमांत विशिष्ट तांत्रिक अर्हता धारण करण्याची पूर्वशर्त नाही. सेवाप्रवेशानंतर काही संवर्गांना भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद येथे प्रशिक्षण देण्यात येत असले तरी ते अल्पकालावधीचे असून त्याचे सक्षम प्राधिकरणाकडून प्रमाणिकरण झालेले नाही. या पार्श्वभूमिवर भूमि अभिलेख विभागास सरसकट तांत्रिक विभाग म्हणून मान्यता देणे शक्य होत नाही.

भूमि अभिलेख विभागातील गट क पदांचे डिसेंबर, २०११ मध्ये अधिसूचित सेवा प्रवेश नियम, २०११ नुसार भूमि अभिलेख विभागातील गट क 'पदसमुह ४' मध्ये सेवा प्रवेश करणाऱ्या उमेदवार स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) किंवा माध्यमिक शालांत परिक्षा (S.C.C.) उत्तीर्ण झाल्यानंतर आय.टी.आय. सर्व्हेक्षण अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे अशी शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेनुसार सन २०११ पासून १०५८ पदे भरण्यात आली असून सरळसेवा भरती सन-२०१४ अंतर्गत ५३६ रिक्त पदांची जाहिरात देण्यात आली होती. त्यापैकी ४०७ पदे उपलब्ध झालेली असून २६० उमेदवार हजर झाले आहेत व उर्वरीत उमेदवारांबाबत नियुक्तीची कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील तलाठ्यांच्या बदलीचे अधिकार जिल्हा स्तरावर देण्याबाबत**

**(३) ७७६२५ (१२-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक गावांमध्ये २ ते ३ गावांमिळून एक तलाठी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तलाठ्यांच्या बदलीचे अधिकार जिल्हास्तरावर देण्याचा प्रस्तावही शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांचे ७/१२ संगणीकृत करताना तलाठयांकडून अनेक चुका होत असल्यामुळे तलाठयांबाबत अनेक नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील तलाठयांच्या रिक्त जागा भरण्याबाबत व तलाठयांची बदली करण्याचे अधिकार जिल्हा स्तरावर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०४-२०१८) :** (१) राज्यात सरासरी ३ ते ४ गावांमिळून तलाठी साझे अस्तित्वात असून प्रत्येक साझ्याकरीता एक तलाठी पद मंजूर आहे.

(२) हे खरे नाही,

राज्यातील तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांची बदली करण्यासाठी जिल्हा व उपविभागीय स्तरावर सक्षम प्राधिकारी म्हणून अनुक्रमे जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांना बदल्यांचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. मात्र आंतर जिल्हा व आंतरविभागीय बदल्याचे अधिकार त्यांना नाहीत व असे अधिकार जिल्हास्तरावर देण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) गा.न.नं.७/१२ संगणकीकृत करतांना काही प्रमाणामध्ये डाटा एंट्री व डाटा कन्वर्झनच्या चुका आढळून आल्या होत्या. अशा चुकांचे निराकरण करण्यासाठी चावडी वाचनाच्या विशेष मोहिमेत प्राप्त हरकती व आक्षेप यांच्या निर्गतीसाठी Re-Edit Module ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर सुविधा वापरुन कामकाज पूर्ण झालेनंतर सर्व त्रूटी दूर होतील असे अपेक्षित आहे.
(४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आ.पु.कक्ष, दि.२५/०५/२०१७ अन्वये विभागाचा सुधारीत आकृतीबंध अंतिमत: मंजूर करुन घेतल्यानंतर तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. तलाठ्यांची आंतरजिल्हा किंवा आंतरविभाग बदली करण्याचे अधिकार जिल्हा स्तरावर देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयात अल्पभूधारक व भूमिहिन नागरिकांना वाटप केलेल्या शासकीय जमिनीबाबत

**(४) ७७८८२ (१२-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात अनेक वर्षापूर्वी अल्पभूधारक व भूमिहिन लोकांना अतिरिक्त शेरा असलेल्या शेकडो एकर शासकीय जमिनीचे वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनींची नियम व अटी डावलून तसेच जिल्हाधिका-यांची पूर्वपरवानगी न घेता परस्पर विल्हेवाट लावली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रकरणात दोषी असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०५-२०१८) :**(१), (२), (३) व (४) कोल्हापूर जिल्ह्यात अतिरिक्त शेरा असलेल्या शासकीय जमिनींचे भूमीहीन लोकांना वाटप करण्यात आले आहे. भूमीहीन लोकांना वाटप केलेल्या जमिनीची नियम व अटी डावलून जिल्हाधिकाऱ्यांच्या पुर्वपरवानगीशिवाय विक्री केली जात असल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच जिल्हाधिकाऱ्यांची पुर्वपरवानगी न घेता जमिनीची परस्पर विल्हेवाट लावली जात असल्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर कार्यालयाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

---

## नगरदेवळा (ता.पाचोरा, जि.जळगाव) ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आलेल्या घरांच्या नोंदीप्रमाणे सिटी सर्व्हे कार्यालयात नोंदी करण्याबाबत

**(५) ७९५०६ (१२-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरदेवळा (ता.पाचोरा, जि.जळगाव) ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आलेल्या घरांच्या नोंदीप्रमानेच सिटी सर्व्हे कार्यालयात नोंदी करण्याचे आदेश देण्याबाततचे लेखी निवेदन श्री.अशोक भावसार यांनी दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.सहकार राज्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी सन-१९७८ ते १९८८ च्या काळात नगरदेवळा गावास नगर भूमापन योजना लागू करण्यात आली. त्यावेळी तेथील काही धारकांनी नगर भूमापन हद्दीतील मिळकतींच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात खरेदी खताच्या दस्तामध्ये नगर भूमापन क्रमांक नमूद करण्याऐवजी ग्रामपंचायत मिळकत क्रमांक नमूद केले आहे. त्यामुळे खरेदी-मिळकतींचे वर्णन नगर भूमापन क्रमांकाशी जुळत नाही. तरी सदर गावास ग्रामपंचायत मिळकतीप्रमाणे नोंदी घेण्याबाबत खालील प्रमाणे पर्याय उपलब्ध आहेत :-
(अ) जिथे केवळ ग्रामपंचायत क्रमांक नमूद आहे. मात्र, नगर भूमापन क्रमांक नमूद नाही, अशा ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन धारक, क्षेत्र इत्यादी नगर भूमापन अभिलेखाशी जुळत असल्यास, त्याची नियमाप्रमाणे नोंद घेता येईल.
(ब) जेथे ग्रामपंचायत नंबरप्रमाणे खरेदीखत केले आहे व अभिलेखाप्रमाणे मिळकत पत्रिकेतील क्षेत्र आणि नकाशा धारकास मान्य असल्यास व त्याप्रमाणे त्यांनी नोंदणीकृत विधीवत दुरुस्ती लेख करुन आणल्यास, त्याची महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९, १५० अन्वये नोंद घेता येतील.
(क) जेथे ग्रामपंचायत मिळकत क्रमांक व नगर भूमापन क्रमांक याचे वर्णनातील धारक, नकाशाची आकृती, क्षेत्रफळ व चुत:सिमा मान्य नसल्यास, त्याठिकाणी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६, २४७ व २५७ च्या तरतुदीनुसार जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे संबंधीत धारकाने अर्ज करुन रितसर दाद मागणी करु शकतात.
प्रस्तुत प्रकरणात निवेदनकर्ता यांना त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने उप अधीक्षक भूमि अभिलेख, पाचोरामार्फत लेखी उत्तर कळविण्यात आलेले आहे.

---

### कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी केलेला गैरव्यवहार

**(६) ८४५०२ (१२-०४-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.रमेश आगवणे, कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी अधिक्षक अभियंता अनिल गायकवाड यांच्या शिवनेरी बंगल्याची विदयुत देयके स्वत:च्या सहीचे चेक काढून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या खात्यातून भरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी चौकशी करून श्री.रमेश आगवणे दोषी असल्याबाबतचा अहवाल दिनांक ५ जुलै, २०१६ रोजी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवाल शासनास सादर करुन ७ महिन्यांचा कालावधी होऊनही या प्रकरणातील दोषी अधिका-यांवर अदयाप शासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने उक्त प्रकरणात दोषी असणाऱ्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०४-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) तत्कालीन अधीक्षक अभियंता, ठाणे (सा.बां.) मंडळ, ठाणे यांच्या शासकीय निवासस्थानाची काही विद्युत देयके शासकीय तिजोरीतून भरण्यात आली अशा आशयाची तक्रार शासनास प्राप्त झाली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुंबई सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्याकडून अहवाल प्राप्त झाला आहे.

प्रस्तुत प्रकरणी अनियमिततेस जबाबदार असलेल्या सर्वसंबंधितांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ व १२ अन्वये एकत्रित विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत, मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

---

### मौजा झुली (ता.केळापुर, जि.यवतमाळ) येथील सर्व्हे क्र.४७ पैकी ३ हेक्टर ४३ आर जमीन बनावट दस्तऐवज तयार करून गैरआदिवासी व्यक्तीने हस्तगत केल्याबाबत

**(७) ८९६०१ (१८-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा झुली (ता.केळापुर, जि.यवतमाळ) येथील सर्व्हे क्र.४७ पैकी ३ हेक्टर ४३ आर जमीन बनावट दस्तऐवज तयार करून गैरआदिवासी व्यक्तीने आदिवासी असल्याचे दाखवून हस्तगत केल्याबाबत सुभाष भिमा मेश्राम यांनी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ, मुख्य वनसंरक्षक, (प्रा.) यवतमाळ, पोलीस अधिक्षक, यवतमाळ, उपविभागीय अधिकारी केळापूर, उपवनसंरक्षक, वन विभाग, पांढरकवडा यांना निवेदन देऊन दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०४-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी श्री. सुभाष भिमा मेश्राम यांनी तहसिलदार, केळापूर, जि. यवतमाळ यांना दि. १५/०१/२०१६ रोजी निवेदन देऊन दोषींवर कार्यवाही करण्याची मागणी केली होती. तसेच सदर निवेदनावर कार्यवाही न केल्यास दि. १९/०१/२०१६ पासून तहसिल कार्यालय, केळापूर यांचेसमोर आमरण उपोषण करणार असल्याचे नमूद केले होते. उप विभागीय अधिकारी, केळापूर, जि. यवतमाळ यांनी दि. ०२/०२/२०१६ च्या पत्रान्वये उप वनसंरक्षक, वन विभाग, पांढरकवडा व तहसिलदार, केळापूर यांना उक्त प्रकरणाची संयुक्त चौकशी करण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणी उप विभागीय अधिकारी, केळापूर, जि. यवतमाळ यांनी संबंधित तलाठी यांना दि. १६/०३/२०१६ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे. तसेच सदर तक्रारपुर्वीच तहसिलदार, केळापूर यांनी महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ च्या कलम ३ नुसार दि.२५/०६/२०१५ रोजी आदेश पारित करुन निवेदनकर्त्यास जमीन प्रत्यार्पित करण्याची कार्यवाही केली आहे.

---

**राज्यातील बांधकाम क्षेत्रातील बाजार मुल्य (मुद्रांक शुल्क) तक्ता तयार करणेबाबत**

**(८) ९०११७ (१२-०८-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बांधकाम क्षेत्रातील बाजार मुल्य विचारात घेऊन मुद्रांक शुल्क तक्ता तयार करण्याची मागणी कराड-उत्तर येथील लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) संपूर्ण राज्यासाठी सन २०१७-१८ साठी वार्षिक मूल्यदर तक्ते दि.३१/०३/२०१७ रोजी नोंदणी महानिरीक्षक यांच्याकडून निर्गमित करण्यात आले असून ते दि.०१/०४/२०१७ पासून लागू झाले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भातुकली (जि.अमरावती) तालुक्यातील तहसिल कार्यालय अमरावती येथील नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत**

**(९) ९३४०१ (२३-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातुकली (जि.अमरावती) तालुक्यातील तहसिल कार्यालय अमरावती येथील नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यासाठी मा.उदयोग, खनिकर्म व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री यांना दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१८) :** (१), (२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उद्योग, खनिकर्म व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री यांना दिनांक ०३/०३/२०१५ रोजी व त्यासुमारास भातुकली, जिल्हा अमरावती येथील तहसिल कार्यालय इमारत अमरावती येथे बांधकाम करण्यासाठी दिलेले निवेदन त्या कार्यालयास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

भातुकली, जिल्हा अमरावती येथील तहसिल कार्यालयासाठी भातुकली येथे नविन इमारत बांधण्यात आली आहे. सदर कार्यालय या इमारतीत स्थलांतरित करण्याच्या निर्णयाविरोधात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल करण्यात आली असल्याने सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

---

**चिखलठाणा (ता.जि.लातूर) येथील मांजरा नदीवरील पुलाचे काम निधीअभावी रखडल्याबाबत**

**(१०) ९४९५४ (२१-०९-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलठाणा (ता.जि.लातूर) येथील मांजरा नदीवरील पुलाचे काम निधीअभावी रखडले असल्याने सदर कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत व काम त्वरित पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे कोणकोणते काम करणे बाकी असून त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,
(३) तसेच, सदर कामासाठी निधी मंजूर करून पुलाचे बांधकाम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०४-२०१८) :** (१) काम पूर्ण करण्याबाबत निवेदन प्राप्त आहे.
(२) दोन स्तंभ, एक अंत्यंपार, स्लॅब व जोडरस्ते बांधण्याचे काम बाकी असून यासाठी रु.३६६.६७ लक्ष निधीची आवश्यकता आहे.
(३) व (४) पुलाच्या कामाची किंमत प्र.मा.रक्कम रु.६.६८ कोटी पेक्षा वाढून ती रु.११.४२ कोटी इतकी होणे अपेक्षित आहे. त्यामुळे पुलाच्या प्रकल्पाच्या कामास सुधारित प्र.मा.प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## चेंबुर (मुंबई) येथील फाईन आर्टजवळील शासकीय इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(११) ९४९९९ (०१-०१-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबुर (मुंबई) येथील फाईन आर्टजवळ शासनाच्या १४ पेक्षा जास्त विभागाच्या कार्यालयाच्या इमारतींच्या आजूबाजूला प्रचंड प्रमाणात अस्वच्छतेचा विळाखा असून या इमारतीची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीच्या मोकळया भागाचा नशापाणी इत्यादीसाठी गैरप्रकार करण्यासाठी वापर करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दखल घेऊन सदरील शासकीय इमारतीच्या दुरुस्ती व स्वच्छतेबाबत तसेच सदरील इमारतीचा होत असलेला गैरवापर रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुख्य रस्त्यावरील पावसाच्या पाण्याचा निचरा होणेसाठी गटाराची व्यवस्था नसल्याने इमारतीच्या आवारातील सखल भागामध्ये तत्कालीन स्थितीत पाणी साचून अस्वच्छता झाली असल्याचे निदर्शनास आले होते.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) सदरील आवारातील इमारतीची देखभाल व दुरूस्तीची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. तसेच इमारतीचा व इमारतीच्या आवारातील गैरवापर रोखण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरिक्षक, चेंबूर यांना दि.१४/०९/२०१७ अन्वये कळविणेत आले आहे.

---

## मागासवर्गीयांच्या इनामी जमीनी शासनाने ताब्यात घेतल्याबाबत

**(१२) ९६००८ (२१-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीयांच्या उपजीविकेचे साधन असणाऱ्या निरनिराळ्या गावातील जवळपास एक लाख एकर इनामी जमिनी शासनाने ताब्यात घेतल्या असून त्यांना पर्यायी जमिनी न दिल्याने राज्यव्यापी आंदोलन उभारले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार या इनामी जमिनी परत मागासवर्गीयांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०४-२०१८) :** (१) अशी कोणतीही बाब ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक-वणी-कळवण रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(१३) ९६५५९ (२१-१२-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक-वणी-कळवण (जि.नाशिक) या रस्त्यावरील मोठया प्रमाणात राहणाऱ्या रहदारीमुळे अपघात घडण्याचे प्रमाण वाढल्याने रस्त्याचे चौपदरीकरण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०५-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे अंबाडी- वाशिंद (ता.भिवंडी, जि.ठाणे) या रस्त्याच्या कामाबाबत**

**(१४) ९८६६९ (३०-१२-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंबाडी-वाशिंद (ता.भिवंडी, जि.ठाणे) या रस्त्याला एमएमआरडीएने सन २००८-०९ मध्ये ११० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याला स्थानिकांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या रस्त्याच्या कामांस केव्हापासून सुरुवात होणार आहे व किती कालावधीत काम पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१८) :** (१) होय हे खरे आहे
(२) व (३) प्रश्नांकीत रस्त्याच्या रुंदीकरण, मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१२ मध्ये मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने मंजूर केले होते. या कामापैंकी अबांडी ते वाशिंद या दरम्यानच्या २१.२५ कि.मी. रस्त्याच्या लांबीत काम करण्यासाठी ठेकेदारी निश्चित करुन काम हाती घेण्यात आले. स्थानिक ग्रामस्थांनी रस्त्याच्या रुंदीकरणास विरोध केला. त्यामुळे शासनाच्या मालकीच्या जागेतील रुंदीकरणाचे काम पूर्ण करुन काम अंतिम करुन MMRDA यांनी रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सन २०१६ मध्ये हस्तांतरीत केला आहे. सद्यस्थितीत या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजनात नाही.

---

## भडगांव (जि.जळगांव) तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयासाठी कायमस्वरुपी उप अधिक्षक, भूमि अभिलेख मिळणेबाबत

**(१५) ९९३३२ (२१-१२-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगांव (जि.जळगांव) तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयासाठी कायमस्वरुपी उप अधिक्षक, भूमी अभिलेख मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०३-२०१८) :** (१) होय.
(२) तालुक्यातील कामांचा निपटारा होण्यासाठी तसेच नागरिकांच्या कामाच्या सोईसाठी सद्यस्थितीत उप अधिक्षक भूमि अभिलेख, भडगांव, जि.जळगांव या पदाचा पदभार श्रीमती एस.आर.पवार, उप अधिक्षक भूमि अभिलेख, पाचोरा यांचेकडे सध्या अतिरिक्तपणे सोपविण्यात आलेला आहे. उप अधिक्षक भूमि अभिलेख, भडगांव या पदावर नियमित अधिकाऱ्याची पदस्थापना करणेकामी उपलब्धतेनुसार पदोन्नती/नियमित बदलीवेळी विचारात करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौलतापूर (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील शेतकऱ्याची जमीन परत करण्याबाबत**

**(१६) १००१३७ (२१-१२-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौलतापूर (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील शेतकरी श्री.विठ्ठलराव माणिकराव भोसले यांच्या मालकीची गट नं.५९, ६० व ६१ मधील १ हेक्टर, ९० आर एवढी जमिन सन २००० पासून शासनाच्या ताब्यात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या प्रयोजनासाठी व कशाच्या आधारे सदर जमीन ताब्यात घेतली आहे तसेच जमिन मालकांस भूसंपादन अधिनियमानुसार मोबदला किंवा नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मूळ मालकास जमीन परत देण्याबाबत व सदर जमीन ताब्यात घेणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही, सदर जमीन ही श्री. विठ्ठल माणिकराव भोसले यांचे मालकीची नसून ती श्री.लक्ष्मण माणिकराव भोसले यांचे मालकीची आहे.

(२) व (३) श्री. लक्ष्मणराव माणिकराव भोसले यांच्या मालकीची जमीन तत्कालीन उपविभागीय अधिकारी, देगलूर तथा भूसंपादन अधिकारी, देगलूर यांनी गावठाण विस्तारवाढीसाठी संपादित करण्यात आलेली असून जमीन मालकास नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. श्री. लक्ष्मणराव माणिकराव भोसले यांनी दि. ०१.०९.२००३ च्या पत्रान्वये मावेजा स्विकारण्यास असमर्थता दर्शवून उपविभागीय अधिकारी, देगलूर यांचे कार्यालयात अर्ज केला असून मावेजा रक्कम स्विकारण्यास उपस्थित झालेले नाहीत . तथापि सद्य:स्थितीत सदर जमीन शासनाच्या ताब्यात आहे.

(४) मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी केरळ राज्य विरूध्द एम. भास्करन पिल्लाई या प्रकरणात दि.०५/०५/१९९७ रोजीच्या दिलेल्या आदेशानुसार संपादित विनावापर जमिनीची विल्हेवाटीबाबत निर्णय दिला असून त्या अनुषंगाने या विभागाने दिनांक १२ मार्च, २००४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला असून त्यामध्ये असे नमूद करण्यात आहे की, “भूसंपादन अधिनियम १८९४ च्या तरतुदीनूसार सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित केलेली जमीन संपादन प्रयोजनासाठी वापरात अतिरिक्त झाल्यास तिचा वापर अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी करावा. अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी तिची आवश्यकता नसेल, तर अशा अतिरिक्त झालेल्या जमिनीची विक्री केवळ जाहिर लिलावाव्दारे करावी.परंतू ती मुळ भूधारकाला परत करू नये.”

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील इंजोळे ते खडेखोळ रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१७) १००९६८ (२६-१२-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील इंजोळे ते खडेखोळ रस्ता खचला असल्याने सदर रस्त्यावरून वाहतूक तसेच एसटीच्या फेऱ्या रद्द करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गात अनेक शाळा, महाविद्यालये असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून रस्ता पूर्णपणे खचल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०४-२०१८) :** (१) होय.

प्रश्नांकित रस्ता प्रजिमा ८८ चा भाग आहे. रस्त्याच्या कि.मी.८/९०० ते ८/९२५ या लांबीत असलेल्या मोरीच्या लगतच्या रस्त्याचा भाग क्षतिग्रस्त झाला आहे. यामुळे २-३ दिवसांसाठी वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. या भागात तात्काळ दुरस्ती करुन एकेरी वाहतूक चालू करण्यात आली आहे.

(२ ) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्नांकित रस्त्याच्या क्षतिग्रस्त भागात संरक्षक भिंत बांधून कायमस्वरुपी दुरुस्तीचे काम निविदा स्तरावर आहे. कामासाठी ठेकेदारी निश्चित करुन निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**राज्यातील बंद केलेल्या टोल कंत्राटदारांना द्यावयाच्या नुकसान भरपाईच्या रकमेबाबत**

**(१८) १०१४०५ (२१-१२-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ३८ टोल नाक्यापैकी ११ टोल नाके आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ५३ टोलनाक्यापैकी १ टोल नाका अशा एकून १२ टोलनाक्यावरील वसुली दिनांक ३१ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास पूर्णपणे बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ ते २०४० या कालावधीत टोल कंत्राटदारांना साडे सात हजार कोटी रुपयांची भरपाई राज्य सरकारला द्यावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भरपाईची रक्कम शासन कशी उपलब्ध करणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०१-२०१८)** : (१) होय.
(२) होय.
(३) सदर भरपाईची रक्कम अर्थसंकल्पिय तरतुदीतून भागविण्यात येणार आहे.

---

**पालघर जिल्हयात रिलायन्स गॅस कंपनीविरोधात आदिवासींनी केलेल्या महामार्ग रोको आंदोलनाबाबत**

**(१९) १०१६०१ (०३-०१-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयात रिलायन्स गॅस कंपनीने डहाणू, पालघर, तलासरी येथील आदिवासींच्या जमिनी अत्यंत कमी दराने भूसंपादित करुन शेतकऱ्यांच्या केलेल्या फसवणूकी विरोधात दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास प्रकल्प पीडित आदिवासींनी बऱ्हाणपूर येथे हायवे रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना वाजवी नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०३-२०१८) :** (१) हे खरे आहे. दिनांक ६ नोव्हेंबर,२०१७ रोजी प्रकल्पपिडीत आदिवासींनी ब-हाणपूर येथे हायवे रोको आंदोलन केले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) रिलायन्स गॅस पाईपलाईन्स लिमिटेड या संपादक संस्थेने जमिनींच्या वापराचे हक्काचे संपादन पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम,१९६२ चे कलम १०(३) (i to iii) नुसार सदर जमिनीत पाईपलाईन टाकतेवेळी बाधित झालेल्या पिकांची नुकसान भरपाई व इतर नुकसान भरपाई (Other Damages) संबंधितांना अदा केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील ठेकेदारांच्या मागण्या मान्य करणेबाबत**

**(२०) १०२०१८ (०२-०१-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वस्तू व सेवा कर अंदाजपत्रकात समावेश करणे, कमी झालेले दरसुचीतील दर व निविदेतील जाचक अटी रद्द करणे आदी मागण्या मान्य होईपर्यंत रत्नागिरी जिल्हयातील ठेकेदारांनी असहकार आंदोलन सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेकेदारांच्या सदर आंदोलनामुळे जिल्हयातील कोट्यवधी रुपयांची विकासकामे ठप्प झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठेकेदारांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०४-२०१८) :** (१) खरे आहे. तथापि सद्य:स्थितीत ठेकेदारांनी सदरचे आंदोलन मागे घेतले आहे.
(२) हे खरे नाही. परंतु ठेकेदारांच्या असहकार आंदोलनामुळे कामे सुरु होण्यास विलंब झाला आहे.
(३) ठेकेदारांच्या मागण्याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील महसुल विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२१) १०२०६६ (२१-१२-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयात महसुल विभागातील ११८ अधिकारी व कर्मचा-यांची पदे रिक्त असल्यामुळे जिल्हयातील शेतक-यांची तसेच नागरिकांची विविध कामे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बुलढाणा जिल्हयातील महसुल विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०४-२०१८) :** (१) व (२) बुलढाणा जिल्हयात उपजिल्हाधिकारी २, तहसीलदार ३ व नायब तहसीलदार ७ अशा अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून, गट क व ड संवर्गात एकुण १०६ इतकी पदे रिक्त आहेत.

सदर रिक्त असलेल्या पदांचे कामकाज अन्य अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपविलेले असल्यामुळे नागरिकांची विविध कामे प्रलंबित राहिल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे पदोन्नतीने तथा वित्त विभाग शासन निर्णय क्र. २०१५/प्र.क्र.४१/अर्थ- १, दि. ०२ जून, २०१५ मधील तरतुदीनुसार सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांपैकी ५० टक्के किंवा एकूण संवर्गाच्या ४ टक्के यापैकी जे कमी असेल तेवढी पदे सरळसेवेने भरण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील उप अधिक्षक भूमि अभिलेखांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२२) १०२७०८ (२१-१२-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (ता.माढा,जि.सोलापूर) येथील भूमिअभिलेख कार्यालयातील व जिल्हास्तरावरील उपअधिक्षक भुमिअभिलेख हि पदे अनेक वर्षापासून रिक्त असल्याने या पदांचा कार्यभार पर्यायी अधिका-यांवर देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रिक्त पदांमुळे माढा तालुक्यात सुरु असलेले उपसा सिंचन योजनेचे भूसंपादन तसेच जिल्हयातील नागरिकांची अनेक कामे रखडली असल्याने उक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार शासनाकडे निवेदने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सोलापूर जिल्हयातील उप अधीक्षकांची रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०३-२०१८) :** (१) सोलापूर जिल्हयात उप अधीक्षक भूमि अभिलेख संवर्गाची १२ पदे मंजूर आहेत, त्यापैकी २ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे सूपूर्द करण्यात आला आहे.

(२) या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि. २८.०८.२०१७ रोजीचे निवेदन प्राप्त झाले असून ते निवेदन पुढील उचित कार्यवाहीस्तव जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख यांच्याकडे दिनांक १५.०९.२०१७ रोजी पाठविण्यात आले आहे.

(३) शासन आदेश दिनांक २७.१०.२०१७ अन्वये सोलापूर जिल्हयातील रिक्त पदांपैकी उप अधीक्षक भूमि अभिलेख, मंगळवेढा, माळशिरस व करमाळा या पदांवर अधिका-यांना नियुक्ती देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत सोलापूर जिल्हयात फक्त दोन पदे रिक्त आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जाऊवाडी ( जि.लातूर) या गावाला स्वतंत्र महसूली दर्जा देण्याबाबत**

**(२३) १०३४२८ (२१-१२-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाऊवाडी (जि.लातूर) या गावाचे औसा व निलंगा या दोन तालुक्यांत विभाजन झाले असल्याने या गावाला स्वतंत्र महसूली दर्जा देण्याबाबतचा गत ३५ वर्षांपासून रखडलेला प्रस्ताव सध्या उप विभागीय अधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार जाऊवाडी या गावाला स्वतंत्र महसूली दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यातयेत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०३-२०१८) :** (१), (२) व (३) जाऊवाडी जि. लातूर या गावाला स्वतंत्र महसूली गावाचा दर्जा देणेबाबत उपविभागीय अधिकारी, निलंगा यांनी दिनांक ०७.०९.२०१७ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, लातूर यांना अहवाल सादर केला होता. सदर अहवालाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, लातूर यांनी उपविभागीय आधिकारी, निलंगा यांना मूळ गावातील व प्रस्तावीत जाऊवाडी गावातील गट क्रमांक, प्रस्तावीत गावातील क्षेत्र, आकार, पोटखराब क्षेत्र, गट नंबर निहाय खातेदारांची यादी, मुळ गाव व प्रस्तावीत गाव दर्शविणारा नकाशा इ. सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे. सविस्तर प्रस्ताव प्राप्त झालेनंतर जाऊवाडी गावांस स्वतंत्र महसूली गावाचा दर्जा देणेबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, लातूर यांचे स्तरावर करण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला (ता.येवला, जि.नाशिक) विधानसभा क्षेत्रातील रस्त्यांसाठी केंद्रीय मार्ग निधीमधून अनुदान मिळणेबाबत**

**(२४) १०५२२५ (२७-०३-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (ता.येवला, जि.नाशिक) विधानसभा क्षेत्रातील रस्त्यांसाठी केंद्रीय मार्ग निधीमधून अनुदान मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाकडे त्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावानुसार येवला विधानसभा क्षेत्रातील रस्त्यांसाठी केंद्रीय मार्ग निधीमधून अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रस्तावित कामांचे बाबत मा.लोकप्रतिनिधी विधानसभा सदस्य मा.श्री.छगन भुजबळ, माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे तसेच मा.श्री.जयवंतराव जाधव, विधानपरिषद सदस्य यांनी त्यांच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.

(३) त्या अनुषंगाने ४ कामांचे प्रस्ताव सादर करण्यात आले असून मागणी केलेल्या ४ कामांचे एक पानी अंदाजपत्रक (One Page Estimate) मुख्य अभियंता यांनी केंद्र शासनास (MORTH नवी दिल्ली ) सादर केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील ओशिवरा येथील खारफुटीला आग लावण्यात येत असल्याबाबत**

**(२५) १०५३४३ (२७-०३-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील ओशिवरा येथील भगतसिंग वस्ती जवळ ओशिवरा नदीलगत असणाऱ्या खारफुटीवर मातीचे ढीग रचले जात असल्यामुळे खारफूटी नष्ट होत असून काही ठिकाणी खारफुटीला आग लावण्यात येत असल्याची तक्रार 'द लोखंडवाला ओशिवरा सिटीझन वेल्फेअर' असोसिएशनने मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी आणि वन विभागाच्या खारफुटी संरक्षण विभागाचे अधिकारी यांच्याकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच खारफुटी वनांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०५-२०१८) :** (१) व (२) मुंबईतील ओशिवरा भागातील भगतसिंग वस्तीजवळील ओशिवरा नदीजवळ असलेल्या खारफुटीवर मातीचे भराव टाकून खारफुटीला लावलेल्या आगीमुळे खारफुटी नष्ट होत असल्याची परिसरातील नागरिकांकडून जिल्हाधिकारी कार्लयालयाकडे तक्रार करण्यात आलेली आहे.

या तक्रारीबाबत तहसिलदार, बोरीवली कार्यालयामार्फत स्थळ पाहणी करण्यात आली आहे. त्यानुसार मौजे पहाडी गोरेगांव ता. बोरीवली येथील स.नं. १६१ पै. न.भू.क्र. १अ या खाजगी मिळकतीवर डेब्रीज टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. भराव टाकलेल्या ठिकाणी कांदळवन नसून त्या ठिकाणी काटेरी झाडे-झुडपे असून त्यापैकी एक बाभूळीचे झाड थोड्या प्रमाणात जळाल्याचे आढळून आले आहे.

मात्र, डेब्रीज टाकलेली जागा कांदळवनापासून ५० मीटरच्या आत असल्याने डेब्रीज टाकणारी खाजगी व्यक्ती आणि जमीन मालक यांचेविरूध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १५(१)(२) अन्वये बांगूरनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. ०४/१८ दि.०१/०२/२०१८ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) येथील बाहयवळण रस्त्याचे काम करणेबाबत**

**(२६) १०७१६५ (२७-०३-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) येथून जाणाऱ्या राज्य मार्ग क्रमांक १८९ वरील अपूर्ण बाहयवळण रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबतची व राज्यमार्ग क्र.१८९ वरील वाघेत्रे नामखोल पारगड मोर्ले या रस्त्याचे काम सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधीच्या मागणीच्या अनुषंगाने राज्य मार्ग क्रमांक १८९ वरील बाहयवळण रस्त्याचे काम पूर्ण करून वाघेत्रे नामखोल पारगड मोर्ले या रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१८) :** (१) नाही.

तथापि मा.श्री.संध्यादेवी कुपेकर वि.स.स. यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांचेकडे निवेदन सादर केले आहे.

(२) व (३) प्रश्नांकित कामास शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून काम अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले आहे. कामाचे सर्वेक्षण करुन सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. या कामाच्या निविदा बोलावून ठेकेदारी निश्चित करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**चंदगड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) जवळील ताम्रपर्णी नदीवरील पुलाची उंची वाढविण्याबाबत**

**(२७) १०७२१० (२७-०३-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) जवळील ताम्रपर्णी नदीवरील पुलाची उंची वाढविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१८) :** (१) होय.
(२) सदर पुल हा १९६८ साली बांधण्यात आलेला असल्याने पुलाची उंची वाढविणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही असे लोकप्रतिनीधींना कळविण्यात आले आहे. सदर ठिकाणी नवीन पूल बांधावयाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडहिंग्लज-चंदगड (जि.कोल्हापूर) या राज्यमार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२८) १०७३३२ (२७-०३-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडहिंग्लज-चंदगड (जि.कोल्हापूर) या राज्यमार्गाची मोठया प्रमाणात दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर राज्यमार्गाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
तथापि रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर काही ठिकाणी पडलेले खड्डे भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.
(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्ता कोल्हापूर परिते गारगोटी गडहिंग्लज चंदगड रस्ता रा.मा.१९९ चा भाग आहे. प्रश्नांकित गडहिंग्लज ते चंदगड या दरम्यानच्या रस्त्याची लांबी ४२.५० कि.मी. आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे भरण्यात आले आहेत. रस्त्याच्या या भागातील क्षतिग्रस्त लांबीतील रुंदीकरण मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे. काम निधिच्या उपलब्धतेनुसार सप्टेंबर १८ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
सदयस्थितीत रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

---

### केत्तूर-१ ते केत्तूर-२ वाशिंबे सोगाव प्रजिमा-१२५ या रस्त्यावर पुल व जोडरस्ता बांधण्यासाठी निधी देण्याबाबत

**(२९) १०७३६२ (२७-०३-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केत्तूर-१ ते केत्तूर-२ वाशिंबे सोगाव प्रजिमा-१२५ या रस्त्यावर कि.मी. ०/०० ते ३/४०० मध्ये पुल व जोडरस्ता बांधण्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी नाबार्ड अंतर्गत उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून याबाबतचा अहवाल मागवीला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मंत्री महोदयांना उक्त अहवाल प्राप्त झाला आहे काय, तसेच उक्त ठिकाणचा पुल व जोडरस्ता बांधण्याच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे
(३) व (४) प्रश्नांकित पूल केत्तूर -१ ते केत्तूर-२ वाशिंबे सोगाव प्रजिमा-१२ रस्त्यावर आहे. या पूलाच्या कामास शासनाने रु.८ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून काम मार्च २०१८ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट आहे. कामाचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. कामाच्या निविदा बोलावून काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**अहमदनगर-करमाळा-टेंभूर्णी (ता.माढा, जि.सोलापुर) हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषीत करण्यात आल्याबाबत**

**(३०) १०७४४० (२७-०३-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर-करमाळा-टेंभूर्णी (ता.माढा, जि.सोलापूर) ५१६ ए हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे अद्यापपर्यंत हस्तांतरीत करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबतची कारणे काय आहे वा त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर रस्त्याचा खाजगीकरणामधून विकसित करण्याच्या प्रकरणी निविदा रद्द करण्यास शासनाने दि. २५/०९/२०१७ रोजी तत्वत:मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामाची निविदा रद्द करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर निविदा रद्द केल्यानंतर सदर महामार्ग राष्ट्रीय

महामार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतर करण्यात येईल.दरम्यान सदर रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा-धाड-औरंगाबाद या मार्गावरील दुधा ते धाड या लांबीतील मार्गाचे केंद्र शासनाकडे हस्तांतरण करण्याबाबत**

**(३१) १०७५७८ (२७-०३-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा-धाड-औरंगाबाद या मार्गावरील दुधा ते धाड या लांबीतील भाग राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रस्त्याचे केंद्र शासनाकडे हस्तांतरण करण्याची कार्यवाही पूर्ण न झाल्याने रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरु करता आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या हस्तांतरनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-गोवा महामार्गावर अपघात तसेच वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत**

**(३२) १०७६६४ (२७-०३-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील दाभिक (ता.खेड, जि.रत्नागिरी) या गावाजवळ दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास नायट्रीक ॲसिडची वाहतुक करणारा टँकर उलटून अपघात झाल्यामुळे महामार्गावरील वाहतूक ६ तास ठप्प झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठेकेदाराने सदर महामार्गाचे काम सुरु करताना रस्त्यावरुन धावणाऱ्या वाहनांच्या सुरक्षेबाबत कोणतीही काळजी न घेता काम सुरु केल्याने व त्यामुळे रात्रीच्यावेळी वाहनांना रस्त्याचा अंदाज न आल्याने अनेक अपघात घडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे,
(४) असल्यास, चौकशीनुसार या महामार्गावर अपघात तसेच वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) अपघाताच्या ठिकाणी रस्ता दुपदरी डांबरी पृष्ठभागाचा असून त्याठिकाणी ठेकेदाराने अद्याप चौपदरीकरणाचे बांधकाम सुरु केलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून त्यामध्ये चौपदरीकरणासह रस्त्याची भौमितिक सुधारणा,मागनकानुसार उड्डाणपूल व भुयारी मार्ग तसेच सेवा रस्त्यांचे बांधकाम करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक विभागात राबविण्यात येणाऱ्या राजस्व अभियानात गतिमानता आणण्याबाबत

**(३३) १०७६७९ (२७-०३-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी व प्रशासकीय कामकाज लोकाभिमूख, कार्यक्षम, गतिमान आणि पारदर्शक करण्याच्या दृष्टीने महसूल विभागाने राजस्व अभियान सुरु केले तरीही मात्र नाशिक विभागात शेतक-यांचे अनेक प्रश्न प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक जिल्हयात गत चार वर्षात केवळ ११ किलोमीटर तर एकंदरीत नाशिक विभागात १४१ कि.मी. लांबीचे रस्ते अतिक्रमण मुक्त करण्यात आले असून विभागातील अर्धन्यायिक प्रकरणे निकाली काढण्यासाठी एक वर्षाची मुदत देण्यात आलेली असतांना नाशिक ४००, नंदूरबार ९०, जळगांव १४०, नगर ६०० एवढी प्रकरणे उक्त जिल्हयात प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार नाशिक विभागातील प्रशासकीय कामकाज गतिमान करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१८) :** (१) नाशिक विभागात शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न अद्याप प्रलंबीत असुन प्रलंबीत प्रकरणांबाबत सत्वर कार्यवाही करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.
(२), (३) व (४) नाशिक महसूल विभागात फेब्रुवारी २०१८ पावेतो एकुण ३४४.०८ कि.मी.लांबीचे रस्ते अतिक्रमण मुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच नाशिक महसूल विभागात एकुण १८०१ अर्धन्यायिक प्रकरणे १ वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी प्रलंबित असुन प्रलंबित प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक व जिल्हाधिकारी, जळगांव यांनी मुदतवाढ मिळण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर केलेले आहेत. सदर मुदतवाढीबाबतचे प्रस्ताव शासन स्तरावर तपासण्यात येत आहेत.

तसेच अर्धन्यायिक प्रकरणांची निर्गती विहीत कालावधीत करण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांच्यामार्फत संबंधितांना कळविण्यात आलेले असुन मासिक सभेत आढावा घेण्यात येवुन प्रकरणे १ वर्षाच्यावर प्रलंबित न ठेवण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर ते औरंगाबाद या मार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(३४) १०७७०२ (२७-०३-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर ते औरंगाबाद या मार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे व त्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०५-२०१८) :** (१) अहमदनगर ते औरंगाबाद रस्ता प्ररामा ०५ (रामा ६०) किमी १२०/२०० ते १६२/०० भाग अहमदनगर ते वडाळा व किमी १६२/०० ते २२४/६०० भाग वडाळा ते औरंगाबाद या रस्त्याचे BOT तत्वावर अनुक्रमे सन २००८ व २००९ मध्येच चौपदरीकरण पूर्ण झाले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मांडवे (ता.जि.अहमदनगर) येथील शहीदाच्या कुटंबाला जमीन मिळण्याबाबत**

**(३५) १०७८३८ (२७-०३-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मांडवे (ता.जि.अहमदनगर) येथील निवासी हवालदार त्रिंबक दादा निमले यांनी सन १९९१ मध्ये आसाम येथे २६ मराठा साईट इन्फंट्रीत तैनात असताना ऑपरेशन बजरंगी या युध्दात अतुलनीय शौर्य गाजवून देशासाठी शहीद झाले असून सैन्यदलाने त्यांना मरणोत्तर शौर्यपदक देऊन सन्मान केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्या कुटंबानी शासनाकडून कृषी प्रयोजनार्थ जमीन मिळण्याकरीता तहसिलदार नगर यांच्याकडे अर्ज केला असून या शहिदाच्या कुटूंबाला अदयापपर्यंत जमीन न मिळाल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून या शहीद जवानाच्या कुटूंबीयांना शासनाकडून कृषी प्रयोजनार्थ जमीन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) अर्जदार श्रीमती व्दारकाबाई त्रिंबक शिंदे यांनी दिनांक ८/१/२०१५ रोजी जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या कार्यालयाकडे जमीन मिळण्याबाबत अर्ज केलेला असुन त्यानुसार जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना उप विभागीय अधिकारी, नगर भाग, नगर यांनी अहवाल सादर केला होता. सदर अहवालाच्या अनुषंगाने काही त्रुटींची पुर्तता करणेबाबत उप विभागीय अधिकारी,नगर यांना कळविण्यात आलेले आहे. उपविभागीय अधिकारी, नगर भाग,नगर यांच्याकडून त्रुटीपुर्ततेसह अहवाल जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना सादर झाल्यानंतर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याची दक्षता ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुकाणा (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवरील अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(३६) १०७८८१ (२७-०३-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकाणा (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १० गुंठे जागेवर केलेले अतिक्रमण हटविण्याबाबतचा आदेश उच्च न्यायलयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १९ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी नेवासा तहसिलदार यांना दिनांक २० जून, २०१६ रोजी पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविले असून अद्यापपर्यंत याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणतीही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, न्यायलयाच्या आदेशाप्रमाणे उक्त जागेवरील अतिक्रमण हटविण्याबाबत तसेच आदेशाचे पालन न करणा-या तहसिलदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे कुकाणा ता.नेवासा येथील गट नं.१४३क्षेत्र ०.१० आर या सरकारी जमिनीवरील अतिक्रमणासंदर्भात दाखल जनहित याचिका क्र.१३६/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक २७/४/२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी प्रकरणी सुनावणी घेवुन आदेश दिनांक २० जुन २०१६ अन्वये तहसिलदार,नेवासा यांना अतिक्रमण निष्कासीत करणेबाबत नियमानुसार कार्यवाही करणेबाबत आदेशित केले होते. त्यानुसार तहसिलदार नेवासा यांनी अतिक्रमणधारकांना अतिक्रमण काढून घेणेबाबत कळविले होते तसेच मंडळाधिकारी,कुकाणा यांना देखिल अतिक्रमण काढणेबाबत आदेशित केले होते. त्यानुषंगाने दिनांक १७/२/२०१८ रोजी मौजे कुकाणा येथील १० गुंठे जमीनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अडगाव खुर्द (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) या गावामध्ये जाणाऱ्या पोच रस्त्याचे काम करणेबाबत**

**(३७) १०८७२८ (२७-०३-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलोरा विमानतळ (जि.अमरावती) वळण रस्त्यामुळे अडगाव खुर्द (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) गावामधील रस्ता बाधीत होवून नागरीक व शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याने पोच रस्त्याचे काम करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती आणि २४ जानेवारी, २०१८ रोजी उपाध्यक्ष तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांना लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर पोचरस्त्यासाठी निधीची तरतूद करून रस्त्याचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०५-२०१८) :** (१) निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) बेलोरा ते अडगाव हा प्र.जि.मा.७६ रस्त्याचा भाग असून अत्यंत क्षतीग्रस्त असल्यामुळे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे अत्यावश्यक आहे व त्याकरिता रु. ८०.०० लक्ष निधी आवश्यक आहे.

(४) मागणीकृत रस्त्याचे काम निकष,मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात येईल.

---

### गडचांदुर (ता.कोरपना, जि.चंद्रपुर) या शहराला तालुका घोषित करण्याबाबत

**(३८) १०९१९९ (२७-०३-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदुर (ता.कोरपना, जि.चंद्रपुर) या शहराला तालुका घोषित करण्यासाठी गडचांदुर येथील नागरिकांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१५ पासुन जनआंदोलन उभारून माहे डिसेंबर, २०१७ मध्ये नागपूर अधिवेशन काळात विविध आंदोलने करून शासनाचे लक्ष वेधले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तत्कालीन उपविभागीय अधिकारी, राजुरा यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांच्याकडे प्रस्ताव सादर केला असून जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांनी विभागीय आयुक्त, नागपुर यांच्याकडे उपरोक्त प्रस्ताव दिनांक ३१ जानेवारी, २०१६ रोजी सादर केला आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१) होय.
(२) होय.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दि. १३.०१.२०१६ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपर यांना सादर केला आहे.
(३) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याची प्रक्रिया सुरु आहे. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निश्चित केल्या जाणाऱ्या निकषानुसार तालुका विभाजनाबाबत प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील प्रलंबित रस्त्यांच्या कामांचा समावेश नाबार्ड २३ योजनेअंतर्गत करण्याबाबत

**(३९) ११०३८७ (२७-०३-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील अनेक रस्त्यांची कामे दीर्घकाळापासून प्रलंबीत असल्याने या रस्त्यांचा समावेश नाबार्ड २३ योजनेअंतर्गत (२०१७-१८) करण्यात यावा यासंबंधीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ मे, २०१७ रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे,
(३) असल्यास, चौकशीनुसार वसई तालुक्यातील प्रलंबीत रस्त्यांच्या कामांचा समावेश नाबार्ड २३ योजनेअंतर्गत (२०१७-१८) करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०४-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय.
(३) मागणी केलेल्या रस्त्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील स्मशानभुमी नसलेल्या गावात स्मशानभूमी बांधण्याबाबत

**(४०) १११७३ (२७-०३-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात स्मशानभूमी नसलेल्या गावात खाजगी जमीन संपादन करून स्मशानभूमीसाठी जन सुविधा योजनेंतर्गतच्या निधीतून स्मशानभूमी करण्याबाबत गावनिहाय प्रस्ताव उपविभागीय कार्यालयाकडून मागवून सदर प्रस्तावाला मंजुरी देण्याचे जिल्हाधिकारी लातूर यांनी लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्य केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत गावनिहाय प्रस्ताव मागवण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात तालुकानिहाय किती गावात स्मशानभूमीसाठी जागा नाही व किती गावात स्मशानभूमीसाठी जमीन आहे तसेच जन सुविधा योजना निधीतून किती प्रस्तावाला मंजुरी देण्यात आलेली आहे व किती प्रस्ताव मंजुरी अभावी प्रलंबित आहेत

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) लातूर जिल्ह्यातील एकूण ७८४ गावांपैकी २४८ गावात स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नसल्याची माहिती प्राप्त झाली असून उर्वरीत ५३६ गावात स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध असल्याचे दिसून येते. जन सुविधा योजना निधीतून सन २०१७-१८ या वर्षामध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नसलेल्या २४८ पैकी ७८ गावांना उपलब्ध निधी विचारात घेऊन स्मशानभूमी शेड व संरक्षण भिंत बांधकामासाठी मंजूरी देण्यात आली आहे. उर्वरीत १७० गावांना निधी प्राप्त होताच स्मशानभूमीच्या कामाकरीता मंजूरी देण्याची कार्यवाही करण्याचे संकल्पीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रिसोड (जि.वाशीम) तालुक्यातील खरेदी विक्री संघाचे कार्यालय, दुय्यम निंबधक कार्यालय व तहसीलदार कार्यालयाच्या इमारत बांधकामाबाबत

**(४१) १११५३१ (२७-०३-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशीम) तालुक्यातील खरेदी विक्री संघाचे कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय व तहसीलदार कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी कोटयवधी रुपये खर्च करण्यात येवूनही या इमारतींचे बांधकाम पूर्ण न झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कार्यालयांच्या इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच बांधकाम अतिशय संथ गतीने करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१) व (२) रिसोड जि.वाशिम तालुक्यातील खरेदी विक्री संघाच्या कार्यालयाचे बांधकाम सा.बां. विभागाच्या अखत्यारित नाही.

दुय्यम निबंधक कार्यालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सदर इमारत दि.७/५/२०१८ रोजी उपभोक्ता विभागास हस्तांतरित करण्यात आली आहे.

रिसोड येथील प्रशासकीय कार्यालयाचे बांधकाम दि.३१/०५/२०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## शिरागड ते कोळन्हावी (ता.यावल, जि.जळगांव) या रस्त्याच्या मिसिंगलेंथच्या कामासाठी मंजूरी देण्याबाबत

**(४२) १११९६७ (२७-०३-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरागड ते कोळन्हावी (ता.यावल, जि.जळगांव) या प्रजिमा-८ वरील ३ कि.मी. मिसिंगलेंथ रस्त्याच्या कामास मंजूरी देऊन मिसिंगलेंथसाठी असलेल्या २० टक्के राखीव निधीतून निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने या मिसिंगलेंथ रस्त्यास मंजूरी देऊन मिसिंगलेंथसाठी राखीव असलेल्या २० टक्के निधीतून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोजे कोथेळी (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील स्मशानभूमीच्या ७/१२ पत्रिकेवर नावे नोंद होण्याबाबत**

**(४३) ११२०४४ (२७-०३-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोजे कोथेळी (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील बलुतेदार (कुंभार, परीट, आंबी, माळी, सुतार, जंगम) व जैन समाजाकरिता गट नं. २७१ (सि.स.नं. ५८३) मधील ०.१८ पैकी प्रत्येकी ०.९ आर इतके क्षेत्र स्मशानभूमी करिता वहिवाटीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमिनीच्या ७/१२ पत्रिकेवर त्यांची नावे नोंद होण्याकरिता वारंवार मागणी करण्यात आली असून त्याबाबत दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी कोथळी ग्रामसभा ठराव क्र.८९ करण्यात येऊन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठरावाच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला आहे तसेच याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०५-२०१८) :** (१), (२) व (३) मौजे कोथेळी (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील बलुतेदार व जैन समाजाकरिता गट नं. २७१ मधील १८ आर क्षेत्रापैकी प्रत्येकी ९ आर इतके क्षेत्र स्मशानभूमी करिता वहिवाटीत असून उक्त जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ वर त्यांची नावे नोंद होण्याकरिता मागणी करण्यात आली आहे. याबाबत कोथेळी ग्रामसभेने दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी ठराव पारीत करुन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे सादर केला आहे. याअनुषंगाने प्राप्त प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दिनांक ०२.०१.२०१८ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे आवश्यकत्या कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी पाठविला आहे. सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर, यांचेकडे अभिप्रायांसहित प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात अनधिकृत आरक्षण देण्यात येत असल्याबाबत**

**(४४) ११३२९३ (२८-०३-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चर्चगेट, वरळी, दादर, बांद्रा, कोकणभवन व ठाणे येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह असून या विश्रामगृहात आरक्षण करण्यात आलेल्या व्यक्तींच्या नावे दुसरेच व्यक्ती राहत असल्याचे तसेच आर्थिक लाभापोटी सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी नियबाहयरित्या कक्ष आरक्षित करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे, मुंबई येथील कलानगर परिसरात असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात एका अधिकाऱ्याच्या नावे कक्ष आरक्षित करून नियमबाहयरित्या दिल्लीतील करिष्मा शर्मा नामक महिला तब्बल ३९ दिवस मुक्कामाने होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०४-२०१८) :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील मुंबईतील चर्चगेट, वरळी, दादर व ठाणे या ठिकाणी आरक्षण करण्यात आलेल्या व्यक्तींच्या नांवे दुसरीच व्यक्ती राहत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, वांद्रे येथील एका प्रकरणी सदर बाब निदर्शनास आली.

(२) होय, हे खरे आहे.

मुंबईतील कलानगर परिसरात असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात दिल्लीतील करिष्मा शर्मा व नेहा शर्मा नामक दोन महिलांनी मा.केंद्रीय मंत्री यांच्या खोट्या शिफारस पत्राचा वापर करुन दि.१२.०६.२०१७ ते दि.१८.०७.२०१७ या कालावधीत वास्तव्य केल्याचे निदर्शनास आले.

(३) होय.

मुंबई मंडळ स्तरावर गठीत केलेल्या समिती मार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधितांविरुध्द शिस्तभंगात्मक कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजापूर तालुक्याचे विभाजन करून रायपाटण तालुक्याची निर्मिती करण्याबाबत

**(४५) ११४६८६ (२७-०३-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्याचे विभाजन करुन रायपाटण तालुक्याची निर्मिती करण्याबाबतची मागणी सन १९९० पासून स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत असून त्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात यत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निश्चित केल्या जाणाऱ्या निकषानुसार तालुका विभाजनाबाबत प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील महसूल वसुलीबाबत

**(४६) ११५१५० (२७-०३-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महसूल विभाग, नाशिक यांना माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या आर्थिक वर्षासाठी शासनाने २०५ कोटी रुपये महसूल वसूलीचे उद्दीष्ट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७-१८ हे आर्थिक वर्षे पूर्ण होण्यास दोन महिने शिल्लक असतांना माहे जानेवारी, २०१८ अखेर अवघ्या ७७ कोटी ३५ लाख रुपयांची वसूली झाली असून वसूलीचे हे प्रमाण केवळ ३६.४७ टक्केच आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एवढी कमी महसूल वसूली होण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच यापुढे महसूल वसूलीत सुधारणा होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१८) :** (१), (२) व (३) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी शासनाकडून नाशिक विभागासाठी एकूण रु.५४१.१६ कोटी इतके महसूल उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. सदर उद्दिष्टाच्या तुलनेत माहे जानेवारी,२०१८ अखेर नाशिक विभागाकडून रु.२५५.९० कोटी इतकी वसुली करण्यात आली असल्याचे ग्रास प्रणालीवरील आकडेवारीवरून दिसून येते. सदर वसुलीचे प्रमाण ४७.२८% इतके आहे. उर्वरित कालावधीत नाशिक विभागाकडून वसुलीबाबत नियोजन करून माहे मार्च,२०१८ अखेर रू.५३०.३९ कोटी इतकी वसुली करण्यात आलेली आहे. सदर वसुलीचे प्रमाण ९८.००% इतके आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक-पुणे महामार्गावरील चेहेडी गावाजवळील पूल वाहतूकीसाठी खुला करण्याबाबत

**(४७) ११५१५३ (२७-०३-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक-पुणे महामार्गावरील चेहेडी गावाजवळ दारणा नदीच्या पात्रातील पुलाचे काम माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात पूर्ण होऊनही सदर पूल वाहतूकीसाठी खुला करण्यात आला नाही आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पूल वाहतूकीस खूला न होण्याची कारणे काय आहे तसेच सदर पूल वाहतुकीसाठी तातडीने खूला करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०४-२०१८) :** (१) नाशिक-पुणे महामार्गावरील चेहेडी गावाजवळ दारणा नदीवरील नव्याने बांधण्यात आलेल्या पुलावर आवश्यक रस्ते सुरक्षा उपाय योजना करुन दि.१६ फेब्रुवारी,२०१८ पासून नाशिकहून पुण्याच्या दिशेने एकेरी वाहतूक सुरु करण्यात आली आहे.
(२) पुलाच्या नाशिक बाजूकडील जोडरस्त्याच्या जागेतील झाडे तोडणेस मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी स्थगिती दिली असल्याने जोडरस्त्याचे काम पूर्ण रुंदीसाठी करणे शक्य झाले नाही. मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचेकडून झाडे तोडणेची स्थगिती उठवल्यानंतर नाशिक बाजुकडील जोड रस्त्याचे काम पूर्ण रुंदीसाठी पूर्ण केल्यानंतर दुतर्फा वाहतुक सुरु करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जामडोल (ता.जि.अमरावती) हे गांव तिवसा तहसीलमध्ये समाविष्ट करण्याबाबत**

**(४८) ११५५५४ (२७-०३-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामडोल (ता.जि.अमरावती) हे गांव अमरावती तहसिल मुख्यलयापासुन ५० कि.मी. अंतरावर असुन तिवसा तालुक्यापासुन ९ कि.मी. अंतरावर असल्यामुळे नागरिकांची प्रशासकीय व इतर महत्वाची कामे वेळेत पुर्ण होण्यासाठी सदर गाव तिवसा तहसिलमध्ये समाविष्ट करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करून जामडोल हे गाव तिवसा तहसिलमध्ये समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१) होय.
(२) जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून जामडोल हे गाव तिवसा तहसिलमध्ये समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव परिपूर्ण नसल्यामुळे जिल्हाधिकारी,

अमरावती यांचेकडून अधिकची माहिती मागविली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) च्या कलम-४ नुसार तहसीलच्या संरचनेत फेरबदल करण्यासाठी शासन मान्यतेने प्रथम प्रारुप अधिसूचना निर्गमित करुन जनतेच्या हरकती व सूचना मागवून अंतिम निर्णय घेणे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर, औसा व रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील गावे महसुली गावांत रुपांतरीत करण्याबाबत**

**(४९) ११६०६७ (२७-०३-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर,औसा व रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील अनेक वाडी, तांडे व गावे शासनाने दिनांक १८ जानेवारी, १९९६ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र नुसार महसुली गटातून विभक्त करून स्वतंत्र महसुली गावे म्हणून घोषित केली असून त्यानुसार सदर गावांचे स्वतंत्र गट (नकाशा आकारबंद) तयार करण्याची व शासनाच्या अधिसूचनेनुसार हि अधिसूचित गावे स्वतंत्र महसुली गावात रुपांतरीत करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी मा.महसूल राज्यमंत्री व जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १ जानेवारी, १९९६ रोजीच्या राजपत्रातील अधिसूचनेनुसार लातूर जिल्ह्यातील तालुकानिहाय किती गावांना महसुली दर्जा देण्याची कार्यवाही करण्यात आली व सदर गावांना प्रत्यक्षरीत्या महसुली दर्जा प्राप्त होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर गावांना प्रत्यक्षरीत्या महसुली दर्जा प्राप्त होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१) होय.
जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) शासन अधिसूचना दिनांक १८ जानेवारी, १९९६ ही ग्रामविकास व जलसंधारण विभागाची असून त्यानुसार गाव किंवा गावाचा गट म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे.
औसा तालुक्यातील गांधीनगर व देवताळा तसेच रेणापूर तालुक्यातील हणमंतवाडी, काळेवाडी, नेहरुनगर, ब्रम्हवाडी, वंजारवाडी, पोहरेगाव तांडा, कुंभारवाडी, आनंदवाडी व रामवाडी ख. या ९ गावाचे स्वतंत्र गट आकारबंद वेगळी करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, लातूर यांचे स्तरावर सुरु आहे.
(३) उपरोक्त गावांचे स्वतंत्र गट, नकाशे, आकारबंद तयार करण्याची कार्यवाही भूमि अभिलेख विभाग यांचे सहाय्याने सुरु आहे.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील २१ वाडया/पाडयांचे महसूली गावात रुपांतर करण्याबाबत**

**(५०) ११६३२२ (२७-०३-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील २१ वाडया/पाड्यांचे महसूली गावात रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी धुळे व विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सतत पाठपुरावा करुन कोणतीही कार्यवाही न झाल्याने सदर बाब दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी मा.राज्यपाल यांच्या निदर्शनास आणण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त वाडया/पाड्यांचे महसूली गावात रुपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१८) :** (१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील २१ वाड्या/ पाड्यांचे महसूली गावात रुपांतर करण्याबाबत अपर तहसिलदार, पिंपळनेर व उपविभागीय अधिकारी, धुळे यांचेकडून जिल्हाधिकारी, धुळे यांनी प्रस्ताव मागविले आहे.

(२) मा. राज्यपाल महोदयांना उद्देशून लिहिलेले व शासनास पृष्ठांकित केलेले दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(३) उक्त वाड्या/ पाड्यांचे महसूली गावात रुपातंर करण्याबाबत अपर तहसिलदार, पिंपळनेर व उपविभागीय अधिकारी, धुळे यांचेकडून तपासणी करुन परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उक्त वाड्या/ पाड्यांस स्वतंत्र महसूली गावाचा दर्जा देणेबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, धुळे यांचे स्तरावर करण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**